राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४५/का-७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई:-४०० ०३२.
दिनांक:- ०९/१२/२०२५

प्रति,
प्रधान सचिव (पं.रा.-२),
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

विषय:- १) महाराष्ट्र जिल्हा परिषद (निवडणूक विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ तसेच महाराष्ट्र पंचायत समिती (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ मध्ये उमेदवारांच्या नावांच्या वर्गीकरण व वर्णानुक्रमासंदर्भात सुधारणा करण्याबाबत अभिप्राय देणे / मार्गदर्शन करणेबाबत.
२) जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक नियम, १९६२ मधील अपील विषयक तरतूद रद्द करणेबाबत.

संदर्भ:- १) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०१८/प्र.क्र.६/का.७, दि.१४/०२/२०१८
२) आपले पत्र क्र. जिपनि-२०२५/प्र.क्र.१५१/पं.रा.२, दि.०४ डिसेंबर, २०२५

महोदय,

आपण संदर्भाधीन दि.०४ डिसेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद (निवडणूक विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ तसेच महाराष्ट्र पंचायत समिती (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ मध्ये उमेदवारांच्या नावांच्या वर्गीकरण व वर्णानुक्रमासंदर्भात सुधारणा करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे अभिप्राय मागविले आहेत.

२. राज्य निवडणूक आयोगाने सन २००४ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता पक्ष नोंदणी सुरू केली आहे. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/रापनों/२०२४/प्र.क्र.२४/का.११, दि.०५/०५/२०२५ नुसार राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी होणाऱ्या पक्षांची वर्गवारी पुढीलप्रमाणे आहे:-

१. नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्ष ज्यात भारत निवडणूक आयोगाने राष्ट्रीय पक्ष व राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यता दिलेली आहे यांचा समावेश
२. इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष
३. नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष

३. उपरोक्त अनुक्रमांक १ ते २ येथील राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव चिन्ह देण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांना चिन्ह वाटपात अपक्ष उमेदवारांच्यावर प्राधान्य देण्यात येते.

४. सदर बाब विचारात घेता, महाराष्ट्र जिल्हा परिषद निवडणूक नियम, १९६२ मधील नियम २२ व महाराष्ट्र पंचायत समिती निवडणूक नियम, १९६२ नियम २१ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करणे-पोटनियम २ मध्ये पोटनियम ३ च्या उपबंधास अधीन राहून उक्त यादीत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे ज्या क्रमाने लावण्यात येईल व नमुना-४ / नमुना-३ मध्ये प्रसिध्द करण्यात येईल, तसेच मतपत्रिकेवर ज्या क्रमाने लावण्यात येतील ती सुधारणा खालीलप्रमाणे:-

१. नियम क्र.२२ व नियम क्र.२१ - निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करणे-

जिल्हा परिषद निवडणूक नियम २२ (२) व पंचायत समिती निवडणूक नियम २१(२) ऐवजी खालील पोट नियम समाविष्ट करावा:-

२२(२)(i) व २१ (२)(i) पोट नियम(३) च्या उपबंधास अधीन राहून, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी पुढील क्रमाने तयार करण्यात येईल:-

(अ) पहिला गट- भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेली आहे असे मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष व महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष यांचे उमेदवार

(ब) दुसरा गट - भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांचे उमेदवार

(क) तिसरा गट - राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे उमेदवार

(ड) चौथा गट -अपक्ष उमेदवार

(ii) वरीलप्रमाणे प्रत्येक गटातील उमेदवारांचा क्रम लावताना तो मराठी भाषेतील वर्णानुक्रमानुसार लावण्यात येईल. उमेदवारांचा क्रम लावताना प्रथम त्यांचे आडनाव (आडनाव नसल्यास नाव), त्यानंतर नाव, त्यानंतर वडिलांचे/पतीचे नाव व आवश्यकतेनुसार आईचे नाव विचारात घेण्यात येईल.

५. तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषद (निवडणूक विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ चा नियम २२ (२) व महाराष्ट्र पंचायत समिती (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ चा नियम २१(२) व त्यासोबतच्या विहित नमुना ४ व ३ मध्ये सुधारणा करण्यात यावी.

६. तसेच आपणास असेही कळविण्यात येते की, संदर्भाधीन अ.क्र.१ समोरील राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१८/प्र.क्र.६/का.७, दि.१४/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये

महाराष्ट्र जिल्हा परिषद निवडणूक नियम, १९६२ मधील नियम २० व महाराष्ट्र पंचायत समिती निवडणूक नियम, १९६२ मधील नियम १९-अ मधील अपील विषय तरतूद रद्द करण्याबाबत आपणास कळविण्यात आले आहे. (प्रत संलग्न) याबाबत आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

७. उपरोक्त प्रकरणी नमूद करण्यात येते की, नगर परिषद व नगर पंचायत निवडणूक नियमामध्ये अपीलाची तरतूद असून सध्या सुरु असलेल्या नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकीमध्ये मा. जिल्हा न्यायालयाचे निकाल लागल्यानंतर नियमानुसार माघार घेण्यासाठी विहित कालावधी न पाळता चिन्हाचे वाटप झाले असल्यामुळे निवडणूक स्थगित करुन पुन्हा सुधारीत निवडणूक कार्यक्रम देणे राज्य निवडणूक आयोगास क्रमप्राप्त झाले होते. सदर प्रकरणामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र.१४४१७/२०२५ व त्यासोबत संलग्न याचिकांमध्ये दि.०२/१२/२०२५ रोजी दिलेल्या आदेशात नमूद केले आहे की, भविष्यात निवडणुकांसाठी अपिलाच्या वेळेबाबत संभाव्य घटनांच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने दहा आठवडयांच्या आत मार्गदर्शक तत्वे तयार करावीत.

८. जिल्हा परिषद निवडणुकीच्या दरम्यान दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्रावर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामुळे, मग तो नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा असो, अपील दाखल करण्याची तरतूद सध्या नियमामध्ये आहे. सदरचे अपील दाखल करण्यासाठी जिल्हा परिषद निवडणूक नियमामध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणूक नियम, १९६२

१. नियम क्र.१९ - नामनिर्देशनाची छाननी करणे

नियम १९ (८) मध्ये "सर्व नामनिर्देशनपत्राची छाननी करण्यात आल्यावर आणि त्यांचा स्वीकार करण्यात आला आहे किंवा ती नामंजूर करण्यात आली आहेत याविषयी निर्णय नमूद केल्यानंतर ताबडतोब निर्वाचन अधिकारी, नियम २० च्या उपबंधास अधीन राहून, ज्याची नागनिर्देशने स्वीकारण्यात आली असतील त्या उमेदवारांची एक यादी तयार करील."

२. नियम क्र.२० - अपील

नियम २०(१) मध्ये "नामनिर्देशनपत्राचा स्वीकार करण्याबाबत किंवा ते नामंजूर करण्याबाबत निर्वाचन अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही उमेदवारास निर्वाचन अधिकाऱ्याने स्वीकारलेल्या उमेदवाराची नावे असलेली नोटीस नियम १९, पोट-नियम (८) अन्वये ज्या तारखेस सूचना-फलकावर लावण्यात आली असेल त्या तारखेपासून तीन दिवसांच्या मुदतीच्या आत ज्या जिल्हयात जिल्हा परिषदेचे क्षेत्र असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हा न्यायालयाकडे अशा निर्णयाविरुध्द अपील करता येईल.

९. तसेच महाराष्ट्र पंचायत समिती निवडणूक नियम, १९६२ मध्येही नामनिर्देशन पत्र स्वीकारले अथवा नाकारलेबाबत अपील दाखल करण्याबाबत पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

महाराष्ट्र पंचायत समिती निवडणूक नियम, १९६२

१. नियम क्र.१९ - नामनिर्देशनाची छाननी करणे

नियम १९ (७) मध्ये सर्व नामनिर्देशनपत्राची छाननी करण्यात आल्यावर आणि त्यांचा स्वीकार करण्यात आला आहे किंवा ते नामंजूर करण्यात आले आहेत याविषयी निर्णय नमूद केल्यानंतर, तात्काळ निर्वाचन अधिकारी, नियम १९-अ च्या उपबंधास अधीन राहून, ज्याची नामनिर्देशने स्वीकारण्यात आली असतील त्या उमेदवारांची एक यादी तयार करील.

२. नियम क्र.१९-अ अपील-

नियम क्र.१९-अ (१) मध्ये "निर्वाचन अधिकाऱ्याच्या, नामनिर्देशनपत्र स्वीकारणाऱ्या किंवा फेटाळणाऱ्या निर्णयामुळे, व्यथित झालेल्या कोणत्याही उमेदवारास, त्या निर्णयावर, नियम १९ पोट-नियम (७) अन्वये, निर्वाचन अधिकाऱ्याने स्वीकारलेल्या उमेदवारांची नावे असणारी नोटीस सूचना फलकावर लावल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या मुदतीच्या आत, पंचायत समितीचे क्षेत्र ज्या जिल्हयामध्ये असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हा न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल."

१०. मात्र, सध्या सुरु असलेल्या नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या निवडणुकीत असे निदर्शनास आले आहे की, ३ दिवसांची मुदत संपल्यानंतर देखील जिल्हा न्यायालयाकडे अपील दाखल करून घेण्यात येत आहेत. त्यामुळे अपील दाखल करण्याचा कालावधी देखील विनाकारण वाढवून मिळत आहे.

११. तसेच भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ ओ नुसार निवडणूक प्रकरणांमध्ये न्यायालयांना हस्तक्षेप करता येणार नाही, अशी तरतूद आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे नियम हे सन १९६६ मध्ये म्हणजेच संविधानातील अनुच्छेद २४३ ओ अस्तित्वात येण्यापूर्वीचे आहेत. तरी सदर नियमातील तरतुदी या संविधानातील अनुच्छेद २४३ ओ शी विसंगत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. तसेच लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ मधील कलम ८१ नुसार कोणतीही निवडणूक याचिका ही निकाल जाहीर झाल्यानंतर ४५ दिवसांत दाखल करता येईल. परंतु कोणत्याही परिस्थिती निवडणुकीच्यापूर्वी दाखल करता येणार नाही (... but not earlier than the date or election of the returned candidate or if their more than one returned candidates at the election and date of their election are different, the later of those two dates.) असे नमूद आहे.

१२. जिल्हा परिषद निवडणूक नियम, १९६२ मधील नियम २० च्या पोटनियम ७ व पंचायत समिती निवडणूक नियम, १९६२ मधील कलम १९-अ च्या पोटनियम ७ मध्ये अशी तरतूद आहे की, प्रत्येक अपिलाची सुनावणी प्रत्येक दिवशी करण्यात येईल आणि जिल्हा न्यायालयाकडून असे अपील शक्य होईल तितक्या लवकर निकाली काढले जातील. मात्र, प्रत्यक्षात असे होताना दिसून येत नाही आणि अपिलाचा निकाल देण्यासाठी विविध न्यायालये विविध कालावधी घेतात. जिल्हा न्यायालयावर अपिलाचा निकाल देण्यासाठी कोणतेही बंधन घालता येत नाही, ही वस्तुस्थिती असल्यामुळे अपिलाचा निकाल केव्हा लागेल, हा कालावधी अनिश्चित असतो.

१३. असे असल्यामुळे ज्या जिल्हा परिषद निवडणूक विभागात किंवा पंचायत समिती निर्वाचक गणात अपील दाखल झालेले आहेत, त्या ठिकाणी निवडणुकीचे पुढील टप्पे उदा. उमेदवारी मागे घेणे, चिन्ह वाटप, इत्यादी प्रक्रिया ही अनिश्चित काळासाठी पुढे ढकलावी लागते. त्यामुळे या निवडणूक विभाग/निर्वाचक गणाचे मतदान इतर निवडणूक विभाग/निर्वाचक गण ज्यामध्ये अपील दाखल झालेले नाहीत यासोबत घेणे शक्य होत नाही.

१४. जिल्हा परिषद/पंचायत समिती निवडणुकीचा कार्यक्रम हा ठराविक कालमर्यादेत करण्याची तरतूद कायद्यामध्ये आहे. जर निवडणुकीचा कालावधी हा अनिश्चित काळासाठी सुरु राहिला तर निवडणुकीचा निकाल कोणत्या तारखेस लावावा, याबाबत अनिश्चितता राहणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद निवडणूक नियम, १९६२ मधील नियम २० व महाराष्ट्र पंचायत समिती निवडणूक नियम, १९६२ मधील नियम १९-अ ची तरतूद ही नियमातून काढून टाकण्यात यावी, जेणेकरून जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे कामकाज ठराविक मुदतीत पूर्ण करता येईल.

१५. तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषद (निवडणूक विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ चा नियम २० व महाराष्ट्र पंचायत समिती (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ चा नियम १९-अ मधील तरतुदीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सुधारणा होणे आवश्यक आहे :-

महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणूक नियम, १९६२

१. नियम क्र.१९- नामनिर्देशनाची छाननी करणे.

नियम १९ (८) मधील "नियम २० च्या उपबंधास अधीन राहून," हे शब्द वगळणे.

२. नियम क्र. २०- अपील: सदर नियम संपूर्णत: वगळावा व तद्अनुषंगाने नमुना ३ मधील नोटीस वगळावी.

३. नियम क्र. २१- उमेदवारी मागे घेणे.

मूळ नियम २१ (१) ऐवजी खालील मजकूर दाखल करावा.

"२१ (१) कोणत्याही उमेदवारास, नियम १९(८) अनुसार वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसाच्या आत त्याने सही केलेल्या व निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधिन केलेल्या लेखी नोटीसीद्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल, मात्र तो दिवस सरकारी सुटीचा दिवस असल्यास त्याच्या लगतच्या सरकारी सुटीच्या नसलेल्या दिवशी नामनिर्देशन मागे घेता येईल."

महाराष्ट्र पंचायत समित्या निवडणूक नियम, १९६२

१. नियम क्र.१९- नामनिर्देशनाची छाननी करणे.

नियम १९ (७) मधील "नियम १९-अ च्या उपबंधास अधीन राहून," हे शब्द वगळणे.

२. नियम क्र. १९-अ अपील: सदर नियम संपूर्णत: वगळावा व तद्अनुषंगाने नमुना २-क मधील नोटीस वगळावी.

३. नियम क्र. २०- उमेदवारी मागे घेणे.

मूळ नियम २० (१) ऐवजी खालील मजकूर दाखल करावा.

"२० (१) कोणत्याही उमेदवारास, नियम १९ (७) अनुसार वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसाच्या आत त्याने सही केलेल्या व निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधिन केलेल्या लेखी नोटीसीद्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल, मात्र तो दिवस सरकारी सुटीचा दिवस असल्यास त्याच्या लगतच्या सरकारी सुटीच्या नसलेल्या दिवशी नामनिर्देशन मागे घेता येईल."

१६. तरी, उपरोक्त परिच्छेदांत नमूद केल्याप्रमाणे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक नियमांमध्ये उमेदवारांच्या नावांच्या वर्गीकरण व वर्णानुक्रमासंदर्भात तसेच अपील रद्द करण्याबाबत आवश्यक ती सुधारणा करावयाचे नियमांचा तक्ता सोबत जोडला असून त्यानुसार बदल करण्यात यावेत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(सुरेश कांकाणी)

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

अ) <u>उमेदवारांच्या नावांच्या वर्गीकरण व वर्णानुक्रमासंदर्भात</u>

महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणूक नियम १९६२

१. नियम क्र.२२- निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करणे-

नियम २२ (२) मधील ऐवजी खालील पोट नियम समाविष्ट करावा:-

२२(२)(i) पोट नियम(३) च्या उपबंधास अधीन राहून, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी पुढील क्रमाने तयार करण्यात येईल:-

(अ) पहिला गट- भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेली आहे असे मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष व महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष यांचे उमेदवार

(ब) दुसरा गट - भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांचे उमेदवार

(क) तिसरा गट - राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे उमेदवार

(ड) चौथा गट - अपक्ष उमेदवार

(ii) वरीलप्रमाणे प्रत्येक गटातील उमेदवारांचा क्रम लावताना तो मराठी भाषेतील वर्णानुक्रमानुसार लावण्यात येईल. उमेदवारांचा क्रम लावताना प्रथम त्यांचे आडनाव (आडनाव नसल्यास नाव), त्यानंतर नाव, त्यानंतर उमेदवारांच्या वडिलांचे/पतीचे व आवश्यकतेनुसार त्यानंतर आईचे नाव विचारात घेण्यात येईल.

२. नमुना-४ (सोबत जोडलेला सुधारीत नमुना)

महाराष्ट्र पंचायत समित्या निवडणूक नियम, १९६२

१. नियम क्र.२१- निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करणे-

नियम २१ (२) मधील ऐवजी खालील पोट नियम समाविष्ट करावा:-

२१(२)(i) पोट नियम(३) च्या उपबंधास अधीन राहून, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी पुढील क्रमाने तयार करेल:-

(अ) पहिला गट- भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेली आहे असे मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष व महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष यांचे उमेदवार

(ब) दुसरा गट - भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांचे उमेदवार

(क) तिसरा गट - राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे उमेदवार

(ड) चौथा गट - अपक्ष उमेदवार

(ii) वरीलप्रमाणे प्रत्येक गटातील उमेदवारांचा क्रम लावताना तो मराठी भाषेतील वर्णानुक्रमानुसार लावण्यात येईल. उमेदवारांचा क्रम लावताना प्रथम त्यांचे आडनाव (आडनाव नसल्यास नाव), त्यानंतर नाव, त्यानंतर उमेदवाराच्या वडिलांचे/पतीचे व आवश्यकतेनुसार त्यानंतर आईचे नाव विचारात घेण्यात येईल.

२. नमुना-३ (सोबत जोडलेला सुधारीत नमुना)

ब) जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक नियमातील अपील तरतूद रद्द करणेबाबत

महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणूक नियम, १९६२

१. नियम क्र.१९- नामनिर्देशनाची छाननी करणे.

नियम १९ (८) मधील "नियम २० च्या उपबंधास अधीन राहून," हे शब्द वगळणे.

२. नियम क्र. २०- अपील: सदर नियम संपूर्णत: वगळावा व तद्अनुषंगाने नमुना ३ मधील नोटीस वगळावी.

३. नियम क्र. २१- उमेदवारी मागे घेणे.

मूळ नियम २१ (१) ऐवजी खालील मजकूर दाखल करावा.

"२१ (१) कोणत्याही उमेदवारास, नियम १९(८) अनुसार वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसाच्या आत त्याने सही केलेल्या व निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधिन केलेल्या लेखी नोटीसीद्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल, मात्र तो दिवस सरकारी सुटीचा दिवस असल्यास त्याच्या लगतच्या सरकारी सुटीच्या नसलेल्या दिवशी नामनिर्देशन मागे घेता येईल."

महाराष्ट्र पंचायत समित्या निवडणूक नियम, १९६२

१. नियम क्र.१९- नामनिर्देशनाची छाननी करणे.

नियम १९ (७) मधील "नियम १९-अ च्या उपबंधास अधीन राहून," हे शब्द वगळणे.

२. नियम क्र. १९-अ अपील: सदर नियम संपूर्णत: वगळावा व तद्अनुषंगाने नमुना २-क मधील नोटीस वगळावी.

३. नियम क्र. २०- उमेदवारी मागे घेणे.

मूळ नियम २० (१) ऐवजी खालील मजकूर दाखल करावा.

"२० (१) कोणत्याही उमेदवारास, नियम १९ (७) अनुसार वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसाच्या आत त्याने सही केलेल्या व निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधिन केलेल्या लेखी नोटीसीद्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल, मात्र तो दिवस सरकारी सुटीचा दिवस असल्यास त्याच्या लगतच्या सरकारी सुटीच्या नसलेल्या दिवशी नामनिर्देशन मागे घेता येईल."

नमुना ४

(नियम २२ पहा)

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी

---------- जिल्हा परिषद निवडणूक-----

---------- निवडणूक विभाग

प्रवर्ग	अ.क्र.	उमेदवाराचे नाव	उमेदवाराचा पत्ता	उमेदवारास नेमून दिलेली निशाणी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
(१) भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेली आहे असे मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष व महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष यांचे उमेदवार (२) भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांचे उमेदवार (३) राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांचे उमेदवार (४) अपक्ष उमेदवार				

ठिकाण :

दिनांक :

सही/-

निवडणूक निर्णय अधिकारी

टिप :- वरील तक्त्यातील स्तंभ क्रमांक (१) नुसार १ ते ४ प्रवर्गातील उमेदवारांचा अनुक्रमांक लागोपाठ देण्यात यावा म्हणजेच प्रत्येक प्रवर्गासाठी स्वतंत्र अनुक्रमांक देण्यात येऊ नयेत.

नमुना ३

(नियम २१ पहा)

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी

---------- पंचायत समिती निवडणूक-----

---------- निवडणूक विभागातील --------- निर्वाचक गण

प्रवर्ग	अ.क्र.	उमेदवाराचे नाव	उमेदवाराचा पत्ता	उमेदवारास नेमून दिलेली निशाणी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
(१) भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेली आहे असे मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष व महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष यांचे उमेदवार (२) भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांचे उमेदवार (३) राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांचे उमेदवार (४) अपक्ष उमेदवार				

ठिकाण :

दिनांक :

सही/-

निवडणूक निर्णय अधिकारी

टिप :- वरील तक्त्यातील स्तंभ क्रमांक (१) नुसार १ ते ४ प्रवर्गातील उमेदवारांचा अनुक्रमांक लागोपाठ देण्यात यावा म्हणजेच प्रत्येक प्रवर्गासाठी स्वतंत्र अनुक्रमांक देण्यात येऊ नयेत.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०१८/प्र.क्र.६/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १४ फेब्रुवारी, २०१८

प्रति,
सचिव,
ग्रामविकास विभाग,
बांधकाम इमारत, मर्झबान पथ,
मुंबई ४०० ००१.

विषय :- जिल्हा परिषदा व पंचायत समित्या निवडणूक नियम, १९६२ मधील अपील विषयक तरतूद रद्द करणेबाबत

महोदय,

महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ मधील नियम २० व महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ मधील नियम १९-अ मधील निवडणूक प्रक्रियेत निर्वाचन अधिकाऱ्यांच्या नामनिर्देशनपत्र स्विकारणे/नाकारणे या निर्णयाविरोधात अपिल करणेबाबतच्या तरतुदी आहेत. सदर नियमांच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :-

स्था.स्व. संस्था	निवडणूक नियम	तरतूद	शेरा
जिल्हा परिषद	नियम-२०(१)	निर्वाचन अधिकाऱ्याने स्विकारलेल्या उमेदवारांची नावे असलेली नोटीस नियम १९, पोट-नियम(८) अन्वये ज्या तारखेस सूचना-फलकावर लावण्यात आली असेल त्या तारखेपासून तीन दिवसांच्या मुदतीच्या आत जिल्हा न्यायालयात अपील करेल.	म्हणजेच छाननीच्या दिवसानंतर किमान ३ (अपील करण्याचे) + ३ (सुनावणीचे) असे ६ दिवस अपेक्षित आहेत. नियम २०(१) नुसार व्यथित उमेदवारावर ३ दिवसांत अपील दाखल करण्याची मर्यादा आहे.
जिल्हा परिषद	नियम-२०(२)(अ)	... अपिलाच्या प्रती मिळाल्यावर, निर्वाचक अधिकारी, ताबडतोब त्या नोटीशीचे सोबत असे निवेदन जोडील की, अशी नोटीस प्रसिध्द केल्याच्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा त्या दिवशी सरकारी सुट्टी असेल तर सरकारी सुटीचा दिवस नसेल अशा लगत पुढील दिवशी अपिलाची जिल्हा न्यायालयासमोर सुनावणी करण्यात येईल .	परंतु नियम २०(१) नुसार दाखल केलेल्या अपिलाची प्रत त्याने साधरणत: त्याच दिवशी निर्वाचन अधिकाऱ्यास देणे अपेक्षित आहे. तसे न झाल्यास नियम २० (२अ) नुसार नोटीस प्रसिध्द करण्यास उशीर होऊ शकतो.

स्था.स्व. संस्था	निवडणूक नियम	तरतूद	शेरा
जिल्हा परिषद	नियम २०(७)	प्रत्येक अपिलाची सुनावणी प्रत्येक दिवशी करण्यात येईल आणि जिल्हा न्यायालयाकडून असे अपिल शक्य होईल तितक्या लवकर (de die in diem) निकालात काढले जाईल आणि त्याचा निर्णय ताबडतोब निर्वाचन अधिकाऱ्यास कळविण्यात येईल,	परंतु नियमात सदर अपील किती दिवसात निकाली काढावे यावर मर्यादा नाही. त्यामुळे निर्णय खूप वेळा लांबणीवर टाकण्यात येतो. उदा. माहे डिसेंबर २०१७ मधे घेण्यात आलेल्या ठाणे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणूक कार्यक्रमानुसार जेथे अपील आहे तेथे उमेदवारी मागे घेणे, निवडणूका लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व निशाणी वाटप इ. दिनांक ७/१२/२०१७ असा होता. तथापि ५२- वाडी निवडणूक विभाग, १०३-वाडी, १०४-चामटोली या निर्वाचक गणामध्ये वैध उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रावर दाखल करण्यात आलेल्या अपीलावर दिनांक ५/१२/२०१७ पर्यंत निकाल देणे अपेक्षित असताना सदर अपिल अर्ज दिनांक ०८/१२/२०१७ रोजी फेटाळण्यात आला. त्यामुळे उपरोक्त निवडणूक विभाग / निर्वाचक गणामध्ये उमेदवारी मागे घेण्यासाठी दिनांक ११/१२/२०१७ रोजी तसेच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व निशाणी वाटप यासाठी दिनांक ११/०१/२०१७ (दुपारी ३.३० नंतर) अशी तारीख निश्चित करुन दयावी लागली. तसेच त्याच दिवशी प्रचाराचा कालावधी संपत असल्याने मान्यताप्राप्त पक्षांव्यतिरिक्त इतर उमेदवारांना प्रचारासाठी अल्प कालावधी मिळाला.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणूक नियम, १९६२ मधील नियम ११ (१) (a) तसेच महाराष्ट्र पंचायत समिती निवडणूक नियम, १९६२ मधील नियम १३(१) (a) मधील तरतूद पुढीलप्रमाणे आहे :- "the last date for making nominations which shall not be later than fifteen days before the date fixed for the poll."

"मतदानासाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेपूर्वी पंधरा दिवसांपेक्षा अधिक उशिराची नसेल अशी तारीख किंवा तो दिवस सरकारी सुटी नसेल अशी लगेच पुढील तारीख असेल..."

नियम ११(१)(ब)- "the date for the scrutiny of nominations, which shall be the day immediately following the last date appointed for making nomination or if that

day is a public holiday, the next succeeding day which is not a public holiday and the time and place for the scrutiny of nominations on that day."

नियम ११(१)(ब)- "नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या शेवटच्या तारखेच्या लगत पुढील तारीख, किंवा तो दिवस सरकारी सुटीचा असेल तर, सरकारी सुटी नसेल अशी लगत पुढची तारीख असेल अशी, नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्याची तारीख, आणि त्या तारखेस नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्याची वेळ व ठिकाण;"

"नामनिर्देशनपत्र छाननीनंतर नियम २०(१) अंतर्गत होणाऱ्या अपिलाच्या मुदतीनंतर जिथे अपील नाही तिथे दुसऱ्या दिवशी (Second day) म्हणजेच १ दिवस सोडून उमेदवारी मागे घेता येऊ शकते. तसेच जिथे अपील आहे तिथे अपीलाच्या निर्णयाच्या दिवसानंतरच्या दुसऱ्या दिवशी किंवा जर असा दिवस सरकारी सुटीचा दिवस असेल तर सरकारी सुटीचा दिवस नसेल अशा लगतनंरच्या दिवशी माघार घेऊ शकतो.

नियम २२ नुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करणे व त्यांना चिन्ह वाटप हि प्रक्रिया उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी केली जाते.

३. परिच्छेद २ मध्ये नमूद केलेला कालावधी लक्षात घेता नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अखेरच्या दिवसापासून चिन्ह वाटप करणेपर्यंतचा कालावधी वगळता उमेदवारांकडे प्रचाराचा कालावधी पुढीलप्रमाणे राहतो :-

टप्पा	अपील नाही तेथे	अपील आहे तेथे
नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा अखेरचा दिनांक ते प्रत्यक्ष निवडणूक	१५	१५
छाननी	१	१
उमेदवारी मागे घेणे	४ (जास्तीत जास्त)	७ (किमान)
चिन्ह वाटप ते मतदान	१०	७ (जास्तीत जास्त)
प्रचाराचे दिवस	८ (किमान)	५ (कमाल)

उपरोक्त अपील तरतुदीमुळे जिथे अपील नाही तेथे किमान ८ व जिथे अपील आहे तिथे ३ दिवसांत अपील निकाली निघेल या शर्तीवर जास्तीत जास्त ५ दिवस हाती राहतात. परंतु छाननी वा उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी सार्वजनिक सुटी आली तर हा कालावधी १-२ दिवसांनी अजून कमी होतो.

ज्यावेळी अपील मुदतीच्या शेवटच्या दिवशी दाखल होते त्यावेळी सहाव्या दिवशी सुनावणी घेणे अपेक्षित आहे. परंतु सदर दिवशी सरकारी सुटी असल्यास सातव्या दिवशी सुनावणी होईल व त्यात त्याच दिवशी अंतिम निर्णय न झाल्यास उमेदवारास चिन्ह वाटपास प्रत्येक दिवसागणीक उशिर होईल व त्यातही सार्वजनिक सुटीचा दिवस वगळावा लागेल. चिन्हवाटपास उशिर झाल्याने सर्व उमेदवारांना वाटप झालेल्या निशाणीनुसार प्रचारास वाव मिळणार नाही व त्यावेळी उमेदवारांकडून नाराजी व्यक्त होते.

४. मतदानाचा किमान १ दिवस अगोदर ई.व्ही.एम. व इतर सर्व साहित्यासह मतदान केंद्र तयार करणेकामी मतदान पथके केंद्रीय स्थानावरुन जाणे आवश्यक असते. म्हणजेच मतपत्रिका हि किमान १ दिवस अगोदर तयार असणे आवश्यक आहे. मतपत्रिका छपाई व सर्व उमेदवारांच्या उपस्थितीत ई.व्ही.एम सीलबंद करण्यास किमान दोन दिवस आवश्यक असतात. सबब जिथे अपील नाही तिथे सुध्दा(८-२=६ दिवस) निवडणूक यंत्रणेस सदर कालावधी अपुरा ठरु शकतो. जिथे अपील आहे तिथे हा कालावधी अतिशय त्रोटक आहे व त्यामुळे चुका होऊ शकतात.

५. महाराष्ट्रातील इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमात तरतुदी अभ्यासता

a) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ कलम ३३ अन्वये निवडणूक याचिका हि मतमोजणीचा निकाल जाहीर झाल्यापासून १० दिवसांत लघुवाद न्यायालयात अपील करण्याची तरतूद आहे.

b) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९५९ कलम १६ नुसार देखील मतदानाचा निकाल जाहीर झाल्यानंतर निवडणूक याचिका दाखल करता येते.

६. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ मधील कलम ८१ नुसार कोणतीही निवडणूक याचिका हि निकाल जाहीर झाल्यानंतर ४५ दिवसांत दाखल करता येईल. परंतु कोणत्याही परिस्थितीत निवडणुकीच्या दिनांकापूर्वी (... but not earlier than the date or election of the returned candidate or if there are more than one returned candidates at the election and dates of their election are different, the later of those two dates.) असे नमूद आहे.

७. तरी, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणूका अधिक पारदर्शक व लोकाभिमुख होणेसाठी मुदतीत व सुरळीत पार पाडणेकामी तसेच सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक नियमांत एकसुत्रता येणेकामी जिल्हा परिषद निवडणूक नियम २०/ पंचायत समिती निवडणूक नियम १९-अ मधील अपील विषयक तरतूद वगळणे आवश्यक वाटते. तरी याबाबत आवश्यक कार्यवाही लवकरात लवकर व्हावी, ही विनंती.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(शेखर चन्ने)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र